**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**गुरुवार, दिनांक २९ जानेवारी, २०२६ /माघ-९, शके १९४७**

**५.** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ नुसार मा.सदस्यांना एका स्वीय सहायकाची व एका वाहनचालकाची सेवा अनुज्ञेय आहे. उक्त अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायकांची नेमणूक) नियम, १९८१ व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वाहनचालकांची नेमणूक) नियम २०२१ विहीत करण्यात आले आहेत. सदरहू नियमानुसार मा.सदस्य विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन स्वीय सहायक/ वाहनचालक यांची नियुक्ती / सेवा समाप्ती केल्याबाबत या सचिवालयास कळवितात.

मा.सदस्यांनी त्यांच्या स्वीय सहायक / वाहन चालकाची नियुक्ती लवकरात लवकर करुन त्याबाबत तातडीने या सचिवालयास कळविणे आवश्यक आहे. मा.सदस्यांकडून आयकरासंदर्भात बचतीची कागदपत्रे व फॉर्म मागविण्यासाठी निर्गमित करण्यात येणाऱ्या परिपत्रकात स्वीय सहायकांची व वाहनचालकांची नियुक्ती भुतलक्षी प्रभावाने न करण्याबाबत सर्व मा.सदस्यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे. तथापि, अद्यापही काही मा.सदस्य त्यांच्या स्वीय सहायक/ वाहनचालकांची नियुक्ती दोन किंवा तीन वर्षापेक्षा अधिक अगोदराच्या कालावधीने म्हणजेच भूतलक्षी प्रभावाने करुन त्याबाबत या सचिवालयास कळवित असल्याचे निदर्शनास आले आहे. अशाप्रकारे भूतलक्षी प्रभावाने नियुक्ती केल्याने खालीलप्रमाणे तांत्रिक अडचणी उद्भवतात.

१. स्वीय सहायक / वाहनचालक यांच्या उपस्थितीची नोंद या सचिवालयाकडे नसते त्यामुळे मा. सदस्यांनी या सचिवालयास कळवेपर्यंत ते मा.सदस्यांकडे कार्यरत आहेत, असे गृहीत धरुन पारिश्रमिक आकारणी केली जाते आणि दरम्यान त्यांची सेवासमाप्ती झाली असल्यास, उक्त बाब या सचिवालयास विहीत वेळेत न कळविल्याने त्यांना तत्पूर्वीच पारिश्रमिकाची रक्कम अदा झाल्यानंतर आधि कार्यरत व्यक्तिस अतिप्रदान होण्याची शक्यता असते तसेच त्यांचेऐवजी नियुक्त करण्यात आलेल्या स्वीय सहायक / वाहनचालक यांचेकरिता पुन्हा पारिश्रमिकाची आकारणी करणे नियमानुसार अडचणीचे ठरते.

२. मा.सदस्यांनी त्यांच्या स्वीय सहायक / वाहनचालकाची भूतलक्षी प्रभावाने नियुक्ती केल्यास चालू आर्थिक वर्षातील तरतूदीमधून मागील वर्षाच्या पारिश्रमिकाची रक्कम प्रदान करावी लागते व त्यामुळे विद्यमान आर्थिक वर्षात कार्यरत स्वीय सहायक / वाहनचालकांसाठी निधी अपुरा पडण्याची शक्यता असते.

**..२/-**

३. त्याचप्रमाणे भूतलक्षी प्रभावाने नियुक्ती केल्यानंतर स्वीय सहायक / वाहन चालकास त्या दिर्घ कालावधीचे पारिश्रमिक एकत्रितरित्या प्रदान केल्यास चालू आर्थिक वर्षाकरिता त्यांना प्रदान होणारी एकूण रक्कम आयकरास पात्र ठरू शकते. एकंदरीतच स्वीय सहायक / वाहनचालकाची भूतलक्षी प्रभावाने सेवा नियुक्ती / सेवा समाप्ती या बाबी वेतनाच्या आणि आयकर वजातीच्या कार्यवाहीसाठी अडचणीच्या ठरतात. याकरीता मा सदस्यांच्या अर्जासहीत, स्वीय सहायक / वाहनचालक यांनी समक्ष येवून या सचिवालयास कळविणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब, निदेशानुसार सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त मुद्दयांबाबत दिनांक १० जुलै, २०२५ रोजी झालेल्या "सदस्यांचे वेतन व भत्ते संयुक्त समितीच्या" बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार " मा.सदस्यांनी त्यांच्या स्वीय सहायक / वाहनचालकाची नियुक्ती केल्यानंतर तातडीने अथवा नियुक्ती नंतर उशिरात उशिरा तीन महिन्यात तसेच जूना स्वीय सहायक बदलावयाचा असल्यास त्याची सेवा समाप्ती एक महिन्यापूर्वी या सचिवालयास कळवावी व विहीत मुदतीत नियुक्ती न कळविल्यास ज्या दिनांकास मा.सदस्याचे नियुक्ती / सेवासमाप्ती बाबतचे पत्र प्राप्त होईल त्या दिनांकापासून त्यांच्या स्वीय सहायक / वाहनचालकाची नियुक्ती / सेवासमाप्ती ग्राह्य धरण्यात येईल "

तसेच स्वीय सहायक / वाहनचालक यांच्या सेवा समाप्तीबाबत तात्काळ न कळविल्यामूळे सेवा समाप्ती करण्यात आलेल्या स्वीय सहायक /वाहनचालक यांना त्या कालावधीचे परिश्रमिक प्रदान झाल्यास त्याची जबाबदारी मा.सदस्यांची राहिल मा. सदस्यांनी उपरोक्त बाबींची कृपया नोंद घ्यावी व या सचिवालयास सहकार्य करावे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : दिनांक २९ जानेवारी, २०२६**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव (३)**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

३) संगणक कक्ष (Website).